**दिनेश**
**बिल्डींग मटेरियल सप्लायर्स**
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर,
वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368,
9860330587

दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे सहसंपादक : तुकाराम कामठे

या गुढी पाडव्याला आपल्या घराला द्या नवीन आणि आधुनिक साज!
इंटेरिअर डिझायनर श्रेया निलाखे
घर, फ्लॅट व ऑफिससाठी आकर्षक आणि आधुनिक इंटेरिअर डिझाईन.
- आधुनिक व मिनिमल डिझाईन
- स्मार्ट स्पेस प्लॅनिंग
- बजेटमध्ये सुंदर इंटेरिअर सोल्युशन्स



संपर्क: 75-59-26-16-75

वर्ष ५ । अंक १९४ । बुधवार २२ एप्रिल २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

## कत्तलीसाठी चालविलेल्या ६२ गोवंशीय जनावरांची सुटका

**एलसीबीची धडाकेबाज कारवाई । ६५ लाखांचा मुद्देमाल जप्त । चौघांवर गुन्हा, एकास अटक**



**कारवाईत यांचा सहभाग**

**सदरची कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी तसेच तपास पथकातील उपनिरीक्षक अनंत सालगुडे, पोलीस अंमलदार गणेश धोत्रे, गणेश लबडे, अतुल लोटके, रोहित येमुल, भाऊसाहेब काळे, चालक अरुण मोरे यांच्या पथकाने केली.**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** कत्तलीसाठी चालविलेल्या तब्बल ६२ कोवंशीय जनावरांची स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने सुटका केली आहे कर्जत तालुक्यातील राशीन परिसरात केलेल्या या धडाकेबाज कारवाईत एकूण चार जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून सुमारे ६२ लाख रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

एलसीबीचे पथक दिनांक २२ रोजी पहाटे कर्जत तालुक्यात पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय माहिती मिळाली की, राशीन गावामध्ये कुरेशी गल्ली येथे गोवंशीय जातीचे जिवंत जनावरे कत्तल करण्याच्या उद्देशाने निर्दयतेने टेम्पोमध्ये भरुन त्यांची वाहतूक करण्याची तयारी सुरू आहे. त्यानुसार पथकाने तात्काळ बातमीतील ठिकाणी जाऊन खात्री केली असता तेथे टेम्पोमध्ये गोवंशीय जनावरे डांबुन ठेवल्याचे दिसून आले. पथक छापा टाकण्याच्या तयारीत असताना पोलिसांचे वाहन पाहून तेथील व्यक्ती पळून जाऊ लागले. पथकाने पाठलाग करून

फरदीन रफीक कुरेशी (वय– २२ वर्षे रा. कुरेशी गल्ली, राशीन ता. कर्जत) या शिताफीने ताब्यात घेतले. त्याच्याकडे चौकशी करता त्याने

सदरची जनावरे ■ पान ४ वर

## तपोवन रोडवरील मल्टीस्टेटमध्ये बनावट सोनेतारणाचा प्रकार उघड

**शाखा व्यवस्थापकाने घेतली पोलिसांत धाव**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सावेडीतील तपोवन रोडवरील एका मल्टीस्टेट सहकारी पतसंस्थेत बनावट सोनेतारण देऊन कर्ज उचलल्याचा प्रकार घडल्याने खळबळ उडाली आहे. याप्रकरणी पतसंस्थेचे शाखा व्यवस्थापक यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात संबंधिताविरुद्ध तक्रार अर्ज दिला असून पोलीस त्याची शहानिशा करीत आहेत.

नगर शहरातील सुमारे शतकोत्तर परंपरा असलेल्या व स्वातंत्र्य सैनिकानी स्थापन केलेल्या नगर अर्बन सहकारी बँकेतील आर्थिक गैरव्यवहार राज्यभरात गाजत आहे. या बँकेतील अनेक शाखांमध्ये सुरुवातीला बनावट सोने तारणाचा प्रकार उघडकीस आला होता. त्यानंतरच बँकेतील मोठ्या आर्थिक घोटाळ्याला वाचा फुटली. त्यापाठोपाठ शहर सहकारी बँक व एक–दोन पतसंस्थांमधीलही असे प्रकार पुढे आले.. नुकतेच अर्बन बँकेतील बनावट तारण ठेवून मोठे कर्ज घेतलेल्या बड्या थकबाकीदारांची मालमत्ता जप्त करण्याची कार्यवाही प्रशासनातर्फे करण्यात आली आहे.

या पार्श्वभूमीवर तपोवन रोडवरील एका मल्टीस्टेट पतसंस्थेत बनावट सोनेतारण ठेवून तब्बल वीस लाखांपेक्षा अधिक कर्ज उचलल्याचा प्रकार समोर आला आहे. त्यामुळे खळबळ उडाली असून याप्रकरणी पतसंस्थेचे व्यवस्थापक यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात संबंधितावरुद्ध तक्रार अर्ज दिला आहे. पोलिसांकडून ज्या प्रकाराची चौकशी सुरू आहे.

**व्यवस्थापनाच्या साथीने गोल्ड व्हॅल्यूअरकडून लबाडी?**


**या पतसंस्थेकडून देण्यात आलेल्या कर्ज रकमेसाठी तारण म्हणून ठेवलेले सोने बनावट असल्याचे निष्पन्न झाल्याने ही तक्रार देण्यात आली. परंतु यात व्यवस्थापनाचा हलगर्जीपणा दिसून येत असून गोल्ड व्हॅल्यूवर एवढे मोठे सोने बनावट सोने खरे असल्याचे प्रमाणपत्र कसा देतो असा प्रश्न उपस्थित झाला आहे. या लबाडीला पतसंस्था व्यवस्थापनातील कोणाची साथ तर मिळाली नाही ना, अशीही शंका उपस्थित केली जात आहे.**

**ठेवीदारांनो सावध व्हा**

**नगर शहरातील नामवंत अर्बन सहकारी बँकेतील घोटाळा उघडकीस आला व ठेवीदारांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला. ठेवी परत मिळविण्यासाठी आंदोलने करण्याची वेळ आली. या त्रासामुळे अनेक ठेवीदारांना आजारपण सुरू झाले. त्यानंतरही बँका, पतसंस्थांमधील घोटाळे बाहेर येतच आहेत. त्यामुळे ठेवीदारांनी आता तरी सावध होण्याची गरज असून खात्रीशीर ठिकाणीच आपले पैसे ठेवण्याची खबरदारी घ्यावी.**

## भरदिवसा शेतात सासू–सुनेवर हल्ला

**दागिने लुटून चोरटे पसार । चिचोंडी पाटील शिवारात मारहाणीत दोघी जखमी**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** तालुक्यातील चिचोंडी पाटील शिवारात भरदिवसा शेतात काम करणाऱ्या सासूसुनेवर हल्ला करून त्यांच्या अंगावरील सोन्याचे दागिने लुटल्याची धक्कादायक घटना २० एप्रिल रोजी दुपारी घडली. या प्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपींचा शोध सुरू आहे.

याबाबत ताराबाई मुरलीधर कोकाटे (वय ६५, रा. चिचोंडी पाटील) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, त्या व त्यांची सून शेत गट क्रमांक ८०४ मध्ये पिंपळा रस्त्यालगत काम करत असताना दुपारी सुमारे एक वाजता दुचाकीवरून आलेल्या दोन अनोळखी व्यक्तींनी अचानक हल्ला चढवला. लाकडी काठीने सासूवर प्रहार करत सुनेलाही लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यात आली. या हल्ल्यात ■ पान ४ वर

## कायनेटिक चौकातील धोकादायक वाहतुकीवर उपाययोजना राबवाव्यात

**नगरसेवक मयूर बांगरे यांचे वाहतूक पोलीस निरीक्षकांना निवेदन**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** नगर–पुणे रस्त्यावरील कायनेटिक चौकात वाढदिवस वाहतूक कोंडी व सातत्याने होणारे लहान–मोठे अपघात यामुळे हा चौक धोकादायक बनला असून त्यावर ठोस व तात्काळ उपाययोजना कराव्यात अशी मागणी नगरसेवक मयूर बांगरे यांनी केली आहे

याबाबत वाहतूक पोलीस निरीक्षकांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, कायनेटिक चौकात दररोज दुपारी व संध्याकाळच्या वेळेस तीव्र ट्रॅफिक जॅमची समस्या निर्माण होत असून, सदर परिस्थिती दिवसेंदिवस अधिकच गंभीर होत आहे. या ठिकाणी वाहतूक शाखेकडून कोणतेही प्रभावी नियोजन किंवा नियंत्रण नसल्यामुळे स्थानिक नागरिक व व्यापाऱ्यांमध्ये तीव्र ■ पान ४ वर

**या उपाययोजना तात्काळ करा**

**कायनेटिक चौकात कायमस्वरूपी ट्रॅफिक सिग्नल यंत्रणा बसवावी वाहतूक नियंत्रणासाठी पोलीस कर्मचाऱ्यांची नियमित नियुक्ती करावी वेग नियंत्रणासाठी आवश्यक उपाययोजना (स्पीड ब्रेकर, संकेतचिन्हे इ.) कराव्यात - या समस्येचे दीर्घकालीन व परिणामकारक निराकरण करण्यासाठी हायवे प्राधिकरण, महानगरपालिका (मनपा) व सार्वजनिक बांधकाम विभाग () यांच्या संयुक्त सहकार्याने योग्य नियोजन करून आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी, अशा मागण्या बांगरे यांनी निवेदनात केल्या आहेत.**

## अॅट्रॉसिटीच्याा गुन्ह्यातील आरोपींच्या विरोधातील विशेष खटला उच्च न्यायालय छत्रपती संभाजीनगर येथे रद्द

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** याबाबत सविस्तर वृत्त असे की, दिनांक १०.०९.२०२२ रोजी बेलवंडी पोलीस स्टेशन ता. श्रीगोंदा येथे आरोपी भानुदास भाऊ वराळे, माथाबाई भानुदास वराळे, सागर भानुदास वराळे रा. रायगव्हाण, ता. श्रीगोंदा यांच्या विरोधात भा.दं.वि कलम ३४१, ३२३, ५०४, ५०६, ३४ सह अनुसुचित जाती आणि अनुसुचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम १८८९ नुसार गुन्हा दाखल झाला होता. सदरील गुन्ह्यामध्ये फिर्यादीने आरोपींच्या विरोधात आरोप केले होते की, भानुदास वराळे यांनी २०१६ साली रायगव्हाण ते बेट वस्ती असा वहिवाटीचा रस्ता बंद केला होता म्हणुन तहसिलदार श्रीगोंदा यांच्याकडे तक्रार केली होती. सदरील रस्ता खुला न झाल्यामुळे आरोपी व फिर्यादी यांच्यामध्ये वाद झाले होते. दिनांक १०.०९.२०२२ रोजी आरोपींनी फिर्यादीस अडवुन दमदाटी करुन जातीवाचक शिवीगाळ केली होती व धमकी दिली होती म्हणुन आरोपींच्या विरोधात गुन्हा दाखल होऊन तपास पुर्ण होऊन मा. सत्र न्यायालय श्रीगोंद येथे विशेष खटला दाखल केला होता. सदरील खटल्यास आरोपींनी मा. उच्च न्यायालय छत्रपती संभाजीनगर येथे फौजदारी अपील दाखल करुन आव्हान दिले होते. सदरील खटल्यामध्ये आरोपींच्या वतीने अॅड. एन. बी. नरवडे यांनी केलेला युक्तीवाद ग्राह्य धरुन तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाच्या हितेश वर्मा वि. स्टेट ऑफ उत्तराखंड व इतर न्याय निवाडे विचारात घेऊन मा. उच्च न्यायालयाचे न्यायमुर्ती श्री. रणजीश आर. व्यास यांनी आरोपीच्या विरोधातील सदरील विशेष खटला रद्दबातल केला.सदरील प्रकरणामध्ये आरोपीच्या वतीने अॅड. एन. बी. नरवडे यांनी काम पहिले.

## परशुरामाची परशु दाखवण्याकरीता नसून अन्यायाच्या विरोधामध्ये चालवण्यासाठीच – आमदार गोपीचंद पडळकर

**जय परशुरामाच्या जयघोषेत परशुराम प्रतिष्ठानच्यावतीने श्री भगवान परशुराम जन्मोत्सवानिमित्त सावेडी परीसरातून भव्य पायी शोभायात्रा**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–**अहिल्यानगर हे नामकरण झाल्यानंतर एक प्रचंड ऊर्जा, प्रचंड शक्ती हिंदू कार्यकर्त्यांच्यामध्ये निर्माण झाली असून काही लोकांना आता सोसत नाही देवा भाऊच्या सरकारने निर्णय घेतला म्हणजे तो अंतिम त्यामध्ये काही मागेपुढे काहीच नसतं श्री परशुराम प्रतिष्ठानला खूप चांगला कार्यक्रम केला आहे मला तुम्हाला सगळ्यांना विनंती करायची आहे तुम्ही सुद्धा या सगळ्या देवांच्या ताकदीने पुढे आला पाहिजे बिरोबाला ,जोतिबाला , खंडोबाला तुम्ही सहकुंटुब आले पाहिजे परंतु आपण सगळ्यांनी एकत्रित आले पाहिजे तुम्ही सुद्धा पट्टणकोडोलीच्या आमच्या यात्रेच्या वेळेस भंडाऱ्याला लावून निघायला पाहिजे अरे कोण आपल्याला वेगळं करू शकत नाही कुठली शक्ती नाही की जे महाराष्ट्रामध्ये आपल्याला वेगळं करेल परशुरामाची परशु काय नुसती दाखवण्याकरीता नसून अन्यायाच्या विरोधामध्ये चालवण्यासाठीच आहे आणि ती आपण चालवलीच पाहिजेत असे प्रतिपादन आमदार गोपीचंद पडळकर यांनी केले.

भगवान श्री परशुराम जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त श्री परशुराम प्रतिष्ठानच्या वतीने पायी शोभायात्रा सायंकाळी रेणुकामाता मंदिर (प्रोफेसर कॉलनी चौक) ते भिस्तबाग चौक, सावेडी भगवान श्री परशुराम जन्मोत्सवाची सांगता झाली. कार्यक्रमाचे अध्यक्ष समर्थभक्त मंदारबुवा रामदासी हे होते. आमदार गोपीचंद पडळकर, वे शा सं सिध्देश्वर निसळ गुरूजी, ह.भ.प. कुं. रेणुकाताई निसळ ,सीए संजय देशमुख, सीए असोसिएशन चे अध्यक्ष अभय कटारिया,पुष्कर कुलकर्णी

प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजय देशपांडे, श्रीया देशमुख, अनंत कुलकर्णी, अतूल शुक्ल अनिरुद्ध भहूरकर,शिरीष देशपांडे, अमित डोंगरे अनिरुद्ध भऊरकर, प्रशांत भालेराव आदी मान्यवर उपस्थित होते.

मंदारबुवा रामदासी म्हणाले सनातन धर्माचे अंग वैदिक ब्राम्हण,गोमाता, यज्ञ,वेद, हे नष्ट करा सनातन धर्म नष्ट झाला म्हणजे देवाचा पराभव होईल म्हणजे दैवी विचार, दैवी संस्कृतीचा पराभव होईल ही मुळ विचारधारा आजही जिवंत आहे वारकरी संपदायाचा पाया भागवत धर्म सनातनी व वारकरी हे वेगळे असू शकत नाहीत प्रत्येक वारकरी हिंदू आहे आणि प्रत्येक हिंदू सनातनी आहे अभिमानाने प्रत्येकाने सांगितले पाहीजे की सनातनी हिंदू आहोत हिंदूना एकता शिकवायची गरज कारण ती त्यांच्या रक्तामध्ये आहे आजच्या युगात एकतेच्या नावाखाली विविधता नष्ट करायला सांगते आमचा सनातन धर्म विविधता नष्ट करायला सांगत नाही विविधेत एकता सांभाळायला सांगते हिंदू समाजातील ■ पान ४ वर

## एआयसारख्या मायावी धोक्याशी लढण्याची ताकद रामचरित मानस देईल – डॉ. कुमार विश्वास

**सुमारे २५ हजार भाविकांच्या उपस्थितीत राम कथेचा भक्तिपूर्ण वातावरणात उत्साहात समारोप**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** आजची तरुण पिढीच नव्हे तर एकूणच समाजमन एआय (कृत्रिम बुद्धिमत्ता) या मायावी समस्याशी झुंजत आहे. या तंत्रज्ञानाने अनेकांचे काम हिरावून घेतले गेले आहे. चुकीच्या व्हिडिओद्वारे समाजमन कलुषित केले जात आहे, पण या धोक्यातून वाचण्याचा उपाय राम कथेत आहे. तरुण पिढीने किंबहुना सर्वांनीच रामचरित मानस वाचले तर रामायण काळातील मायावी शक्तींना प्रभू रामाने कसे नेस्तनाबूत केले याचे दाखले त्यात आहेत. ते संशोधनाच्या दृष्टीने तपासले तर रामचरित मानस एआय सारख्या मायावी धोक्याच्या समस्याशी लढण्याची ताकद देईल, असा विश्वास प्रख्यात व्याख्याते डॉ. कुमार विश्वास यांनी केला.

माजी आमदार स्वर्गीय अरुणकाका जगताप यांच्या प्रथम स्मृती दिनानिमित्त आमदार संग्राम जगताप व सचिन जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली काका ट्रस्टच्या वतीने डॉ. विश्वास यांची अपने अपने राम ही राम कथा आयोजित केली होती. तिचे तिसरे पुष्प गुंफून समारोप करताना डॉ. विश्वास यांनी श्रीरामाने अनेक संकटांशी झुंज देत यश मिळवताना मानवी जीवनातही संकटाशी सामना करून यशस्वी होण्याचा संदेश दिला. नगरकर भाविकांना तीन दिवस राममय करून रामकथेची अद्भुत पर्वणी दिल्याबद्दल कथाकार डॉ.कुमार विश्वास यांचा सचिन जगताप व आ.संग्राम जगताप यांनी श्रीकृष्णाची सुंदर मूर्ती देऊन विशेष सन्मान केला. डॉ.विश्वास यांनी ती मूर्ती स्वतःच्या डोक्यावर घेऊन भाविकांना अभिवादन केले.

राष्ट्रीय पाठशाळेच्या भव्य मैदानावर गेल्या तीन दिवसांपासून ही राम कथा भक्तिपूर्ण वातावरणात रंगली होती. दररोज हजारो भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. समारोपाच्या वेळी सुमारे २५ हजार भाविक उपस्थित होते. यावेळी उपस्थित पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्या हस्ते श्रीराम मूर्तीचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमास हभप जंगलेशास्त्री महाराज, आ. मोनिका राजळे, आ.हेमंत ओगले, भाजप प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे, जिल्हा परिषदेचे सीईओ आनंद भंडारी, मनपा आयुक्त यशवंत डांगे, समर्थ भक्त मंदारबुवा रामदासी, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा संघचालक वाल्मीक कुलकर्णी, भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, श्रीमती पार्वतीबाई जगताप, उद्योजक मनीष छाजेड, मृत्युंजय नाटकाचे दिग्दर्शक निलेश भिसे, विचार भारतीचे रवींद्र मुळे, भाजपा महिला आघाडीच्या अश्विनी थोरात, उपमहापौर अॅड. धनंजय जाधव यांच्यासह युतीचे सर्व नगरसेवक उपस्थित होते. काका ट्रस्ट व जगताप परिवाराच्या वतीने सुवर्णा जगताप, शितल जगताप, डॉ.वंदना फाटके, राजेश भंडारी, अनिल मुरकुटे, गणेश गोंडाळ, नगरसेवक विकी जगताप, अजित जगताप, अनुप काळे, शशीकांत घीगे आदींनी सर्वांचे स्वागत केले.

यावेळी प्रवचनात बोलताना डॉ. कुमार विश्वास यांनी आद्य शंकराचार्यांचे जयंतीनिमित्त स्मरण केले व रामचरित मानस अभ्यास करण्याचे आवाहन केले. मरीच राक्षसाने हरणाचे रूप घेतले तर रावणाने साधू वेश घेऊन ■ पान ४ वर

## दै. आकर्षण निवडक

### अनुसूचित जाती आरक्षणाचे उपवर्गीकरण तात्काळ करा



अहिल्यानगर- अनुसूचित जाती आरक्षणाचे उपवर्गीकरण करून त्याची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी, अशी मागणी मानवी हक्क अभियान व अण्णाभाऊ साठे स्मारक समितीच्या वतीने करण्यात आली आहे. यासाठी संघटनेच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांची भेट घेऊन त्यांच्या मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांना निवेदन पाठविले. यावेळी जिल्हाध्यक्ष लखन साळवे, जिल्हा संघटक अशोक भोसले, शहर संघटक पोपट भोसले, आसाराम साबळे, ॲड. अमित थोरात यांच्यासह विविध पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी त्यांनी राज्यातील अनुसूचित जातींना मिळणाऱ्या आरक्षणाच्या सद्यस्थितीचा सविस्तर आढावा मांडत, त्यातील असमतोल दूर करण्याची गरज अधोरेखित केली. निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, सर्वोच्च न्यायालयाने दि. १ ऑगस्ट २०२४ रोजी दिलेल्या महत्त्वपूर्ण निकालात अनुसूचित जातींचे उपवर्गीकरण करता येते तसेच त्याचे अधिकार राज्य सरकारकडे असल्याचे स्पष्ट केले आहे. या निर्णयाच्या आधारे देशातील तेलंगणा, कर्नाटक, आंध्रप्रदेश, पंजाब आणि हरियाना या राज्यांनी आरक्षणाचे उपवर्गीकरण करून त्याची अंमलबजावणीही सुरू केली आहे. मात्र महाराष्ट्रात अद्याप या निर्णयाची अंमलबजावणी झालेली नाही, याकडे लक्ष वेधण्यात आले. राज्यातील अनुसूचित जातींच्या ६९ जातींपैकी केवळ एका जातीला मोठ्या प्रमाणात आरक्षणाचा लाभ मिळाल्याचे निदर्शनास येते, तर उर्वरित ५८ जातींना ५ टक्के देखील लाभ मिळालेला नाही, अशी गंभीर बाब निवेदनात मांडण्यात आली. यामुळे काही समाजघटक प्रगत होत असताना अनेक समाज अतिमागास अवस्थेतच राहिले आहेत. हा असमतोल दूर करण्यासाठी प्रगत व अतिमागास घटकांचे स्वतंत्र उपवर्गीकरण करणे अत्यावश्यक असल्याचे संघटनेने स्पष्ट केले. विशेषतः मातंग समाजास न्याय मिळण्यासाठी उपवर्गीकरण तातडीने लागू करावे, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

### आदिवासी क्षेत्रातील माध्यमिक शिक्षकांना मुख्याध्यापकाची वेतनश्रेणी लागू करा

अहिल्यानगर -आदिवासी व नक्षलग्रस्त भागात प्रतिकूल परिस्थितीत सेवा बजावणाऱ्या माध्यमिक शिक्षकांना एकस्तर पदोन्नती योजनेतंर्गत मुख्याध्यापक पदाची (ग्रेड पे ४८००) वेतनश्रेणी लागू करावी, या मागणीसाठी शिक्षक भारती संघटनेने आक्रमक पवित्रा घेतला आहे. यासंदर्भात संघटनेच्या वतीने पुणे विभागीय शिक्षण उपसंचालक गणपत मोरे यांना सविस्तर निवेदन देण्यात आले. यावेळी पुणे विभाग कार्याध्यक्ष महेश पाडेकर, पारनेर तालुकाध्यक्ष दीपक फापाळे, अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे शिक्षणाधिकारी संपत मालुंजकर यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते. निवेदनात नमूद केल्यानुसार, शासन निर्णय दि. ०६/०८/२००२ नुसार आदिवासी भागात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या मूळ पदाच्या लगतच्या पदोन्नती पदाची वेतनश्रेणी मिळणे बंधनकारक आहे. माध्यमिक शिक्षकांच्या बाबतीत हे पद माध्यमिक मुख्याध्यापक असून, त्यांना ग्रेड पे ४८०० (-१७) मिळणे अपेक्षित आहे. मात्र, सध्या अनेक ठिकाणी ही वेतनश्रेणी न देता केवळ लगतचा टप्पा दिला जात असून, ही बाब तांत्रिकदृष्ट्या चुकीची आणि अन्यायकारक असल्याचा दावा संघटनेने केला आहे. शिक्षक भारतीचे कार्याध्यक्ष महेश पाडेकर यांनी स्पष्ट केले की, ''नाशिक आणि नांदेड विभागात शिक्षकांना ग्रेड पे ४८०० नुसार लाभ देण्यात आले आहेत. तसेच मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने (रिट याचिका ९१६२/२०२१) आणि मॅट नागपूर खंडपीठाने कर्मचाऱ्यांच्या बाजूने स्पष्ट निकाल दिलेले आहेत. तरीही पुणे विभागात, विशेषतः अहिल्यानगर,पुणे जिल्ह्यातील शिक्षकांना कनिष्ठ स्तरावर वेतननिश्चिती दिली जात आहे, हा न्यायालयाचा अवमान आहे''. आदिवासी उपयोजन क्षेत्रातील शिक्षकांची झालेली चुकीची वेतननिश्चिती रद्द करून त्यांना तात्काळ ग्रेड पे ४८०० सह मुख्याध्यापक वेतनश्रेणी लागू करावी.

## नर्सिंग शिक्षणात डिजिटल युगाची नवी दिशा

### ई-लर्निंग कंटेंट निर्मितीवर मार्गदर्शनपर सत्र उत्साहात संपन्न



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आरोग्य शिक्षणाच्या बदलत्या प्रवाहात डिजिटल माध्यमांचा वाढता प्रभाव लक्षात घेऊन डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनच्या नर्सिंग महाविद्यालयात ई-लर्निंगसाठी विषयवस्तू निर्मिती परस्परसंवादी अध्यापनासाठी मल्टिमिडिया, पॉडकास्ट आणि डिजिटल साधनांचा प्रभावी वापर या विषयावर मार्गदर्शनपर सत्राचे आयोजन करण्यात आले. नर्सिंग शिक्षकांना आधुनिक अध्यापन पद्धतींचे प्रशिक्षण देण्याच्या उद्देशाने आयोजित या सत्राला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या सत्रासाठी प्रमुख संसाधन व्यक्ती म्हणून सहाय्यक प्राध्यापक श्री. अविनाश अ. पुंड (डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनचे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, अहिल्यानगर) यांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले. त्यांनी ई-लर्निंग कंटेंट तयार करताना मल्टिमिडिया साधनांचा प्रभावी वापर कसा करावा याचे सखोल मार्गदर्शन केले. व्हिडिओ, ऑडिओ, अनिमेशन आणि इन्फोग्राफिक्सच्या साहाय्याने अध्यापन अधिक आकर्षक आणि समजण्यास सुलभ बनवता येते, यावर त्यांनी विशेष भर दिला.

नर्सिंग शिक्षणातील क्लिनिकल संकल्पना स्पष्ट करण्यासाठी पॉडकास्ट आणि सिम्युलेशन-आधारित डिजिटल टूल्स अत्यंत उपयुक्त ठरतात, असे त्यांनी सांगितले. तसेच विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग वाढवण्यासाठी क्विझ, ऑनलाइन चर्चा, इंटरॲक्टिव्ह असाइनमेंट्स आणि फीडबॅक प्रणालींचा वापर कसा करावा, याबाबतही त्यांनी मार्गदर्शन केले. डिजिटल प्लॅटफॉर्मचा प्रभावी वापर केल्यास शिक्षण अधिक लवचिक, सुलभ आणि परिणामकारक बनते, असे त्यांनी स्पष्ट केले.

या प्रशिक्षण सत्रामध्ये एकूण ५५ नर्सिंग शिक्षकांनी सहभाग नोंदविला. प्रश्नोत्तर सत्रादरम्यान सहभागी शिक्षकांनी विविध शंका उपस्थित करून विषयाचे सखोल आकलन करून घेतले. कार्यक्रमासाठी वैद्यकीय संचालक डॉ. अभिजीत दिवटे तसेच डॉ. रामचंद्र पाडळकर यांनी मोलाचे सहकार्य व पाठिंबा दिला. त्यांनी नर्सिंग टीमच्या उपक्रमाचे कौतुक करून शिक्षकांचे अभिनंदन केले.

प्राचार्य डॉ. प्रतिभा ए. चांदेकर व उपप्राचार्य डॉ. योगिता औताडे यांनी कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी विशेष प्रयत्न केले. आयोजनासाठी श्री. दिनेश मगर यांनी सहकार्य केले, तर कु. संपदा म्हस्के यांनी सूत्रसंचालनाची जबाबदारी समर्थपणे पार पाडली. एकूणच, या सत्रामुळे नर्सिंग शिक्षकांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने अध्यापन अधिक प्रभावी आणि विद्यार्थीकेंद्रित बनवण्यासाठी आवश्यक कौशल्ये आत्मसात करण्याची संधी मिळाली.

## संसारातील सर्व प्रश्नांची उत्तरे गीतेत मिळतात

### वृंदावन निवासी परम श्रध्देय पूज्य श्री इंद्रेशजी उपाध्याय

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** संसारातील सर्व प्रश्नांची उत्तरे गीतेत मिळतात. संकटांना धीराने सामोरे जाणाराच जीवनाचा आनंद घेतो, असे प्रतिपादन वृंदावन निवासी परम श्रध्देय पूज्य श्री इंद्रेशजी उपाध्याय यांनी व्यक्त केले.

येथील श्रीमती कौशल्यादेवी गौरीशंकरजी गुप्ता, महेश गुप्ता आणि आयुष गुप्ता यांनी सावेडी मधील मिस्कीन मळ्यात आयोजित केलेल्या श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचे समारोपाचे पुष्प गुंफताना ते बोलत होते. सर्वश्री सुधीर झालानी, किसनलाल बंग व प्रदिप पंजाबी यांच्यासह शहरातील मान्यवर प्रतिष्ठित भाविकांनी श्रोत्यांच्या महाप्रसादाची उत्तम व्यवस्था केल्याने हजारो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. या सोहळ्यासाठी निर्माण करण्यात आलेल्या सर्व समितीतील सदस्यांनी अथक परिश्रम घेतल्याने सोहळा सर्वार्थाने यशस्वी झाला.

पूज्य श्री इंद्रेशजी उपाध्याय पुढे म्हणाले, आपल्याकडून कोणीही दुखावले जाणार नाही. आपल्या मुळे कोणीही संकटात सापडणार नाही, याची काळजी क्षणोक्षणी घ्यावी. इतरांना दिल्या गेलेल्या त्रासाची परतफेड आपल्याला करावीच लागते.

श्रीमद् भागवतात श्रीकृष्ण कोण? हे सांगितले आहे म्हणजेच श्रीकृष्णाचा परिचय करून दिला आहे. तर श्रीमद् भगवत गीतेत श्रीकृष्ण स्वतः बोलत आहेत. प्रथम भागवत आणि नंतर गीतेचे वाचन करावे. ऐश्वर्यरूपी, प्रभावशाली श्रीकृष्ण आणि यशोदेचा खोडकर लाला या दोन्हीही कृष्णरूपातील लिला आजही अनुभवता येतात. श्रीकृष्णाच्या बालपणीच्या लिला आपल्या घरातही घडाव्यात यासाठी १०-१२ वर्षापर्यंत मुलांच्या हाती मोबाईल देऊ नका. मैदानावर-पावसात खेळण्याचा, चिखलात माखण्याचा आनंद बालकांना मनसोक्त घेऊ द्या. त्यांच्या पुढ्यात शुध्द सात्विक आहार ठेवा. फास्ट फूड ठेवू नका. बाळ रडतंय द्या मोबाईल, अशी आजची स्थिती असून त्यामुळे बालकांची बुध्दी आणि मनाची गती थांबली आहे. बालकांना दररोज झोपताना भागवत ग्रंथातील, गीतेतील कथा सांगा. त्यांच्या बुद्धीचा विकास होईल. मन प्रफुल्लित होईल.

विश्वाला ज्ञान देण्याचे सामर्थ्य ब्राह्मणात आहे पण आज ब्राह्मण त्या पात्रतेचे राहिले नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. यज्ञ करणे आणि करवून घेणे, दान देणे आणि दान घेणे, वेदशास्त्राचा अभ्यास करणे ही ब्राह्मणांची कामं. रावण हा जन्माने ब्राह्मण होता. त्याने हाती शस्त्र घेतल्याने तो क्षत्रिय झाला. त्याच्या कर्माचे फळ त्याला श्रीरामांकडून मिळाले. सोन्याची लंका असूनही तो सुखाचा आनंद घेऊ शकला नाही.

भारतवर्षातील सर्वात मोठे दत्त मंदिर आपल्या अहिल्यानगर शहरात आहे. या मंदिरात वेदांत विद्यापीठ असून भारतभरातील विद्यार्थी येथे वेदाध्ययन करत आहेत. नगरमधील चतुर्भुज श्रीराम मंदिर, रामानुज परंपरेतील लक्ष्मी नारायण मंदिर, बालाजी मंदिर, व्यंकटेश मंदिर पाहून खूप समाधान लाभले, असे पूज्य श्री इंद्रेशजी उपाध्याय यांनी सांगितले तेव्हा श्रोत्यांच्या भुवया उंचावल्या. आपल्या शहरातील देवदर्शनाचा आनंद महाराजांनी वेळ काढून घेतला, याबद्दल कौतुकाच्या प्रतिक्रिया उमटल्या.

## अण्णासाहेब जावळे पाटील यांची जयंती अंध व दिव्यांग विद्यार्थींना फळे वाटप

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** येथील अखिल भारतीय छावा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष अण्णासाहेब जावळे पाटील यांच्या ४७ व्या जयंतीनिमित्त अहिल्यानगरमधील अनामप्रेम संस्थेतील अंध व दिव्यांग विद्यार्थींना फळे वाटप करुन साजरी करण्यात आली.

यावेळी कोतवाली पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक संभाजीराव गायकवाड, शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे जिल्हाध्यक्ष बापू ठाणगे, पश्चिम महाराष्ट्र युवक आघाडी सचिव दत्ताभाऊ वामन, अखिल भारतीय छावा संघटना जिल्हाध्यक्षा सुरेखाताई सांगळे, रावसाहेब काळे, सतीश वाघ आदींच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात फळांचे वाटप करण्यात आले.

प्रमुख पाहुणे व कोतवाली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री. गायकवाड यांनी समाजातील वंचित व दुर्लक्षित समाज घटकांकडे समाजाने आपुलकीने व प्रेमाने पहायला हवे, छावा संघटनेचे संस्थापक अण्णासाहेब जावळे पाटील यांनी हीच शिकवण आपल्या जीवनातून दिली. आज तेच कार्य संस्था अव्याहत चालू ठेवत आहे याचे कौतुक केले.

## उघड्या चेंबरमुळे वाहनांचे नुकसान; नागरिकांचा ठेकेदाराविरोधात कायदेशीर कारवाईचा इशारा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** गुलमोहर रोड पारिजात चौक परिसरात रस्ता संदर्भात वारंवार सूचना देऊनही संबंधित ठेकेदारांनी आजपर्यंत अंतर्गत चेंबरवर झाकण बसवलेले नाही. त्यामुळे अनेक वेळा वाहनं त्या उघड्या चेंबरमध्ये अडकून अपघात होत असून नागरिकांच्या वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे.

स्थानिक नागरिकांनी याबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली असून, ही



समस्या तातडीने सोडवण्याची मागणी केली आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी व ठेकेदारांनी तत्काळ या चेंबरवर सुरक्षित झाकण बसवावे, अन्यथा नागरिकांकडून त्यांच्याविरुद्ध कायदेशीर कारवाईसाठी तक्रार दाखल करण्यात येईल, असा इशारा नागरिक वतीने माजी सैनिक मनसुख वाबळे यांनी दिला आहे.

भर रस्त्यावर उघडे चेंबर आहेत , पोलिथीन व कचरा , मातीने ते आज पूर्ण भरलेले आहेत, लहान मुले सायकल वर या जा करतात , खेळतात, त्यामध्ये पडले तर मोठे नुकसान होईल, साइड च मुरुम भरलेला नाही अनेकजण गाडीवरून पडतात , याकडे कोणाचेच लक्ष नाही, ठेकेदार चे कर्मचारी सांगितले तरी ते ऐकत नाही.

## आनंदी जीवन व्याख्यानास जिल्हा कोषागार कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांचा उस्फूर्त प्रतिसाद

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** सध्याच्या स्पर्धात्मक व धावपळीच्या युगामध्ये मानवाचे जीवनमान गतिमान झालेले आहे. निसर्गाच्या अलौकिक निर्मितीतून बहरलेल्या सृष्टीमध्ये मानव हा एकमेव बुद्धिजीवी जीव आहे असं आपण मानतो.परंतु सुख-समृद्धीच्या गराड्यात अडकलेल्या आणि तथाकथित प्रगतीच्या हव्यासाने झपाटलेल्या मानवाला आता मात्र स्वतःचाच विसर पडलेला आहे.भौतिक वस्तूच्या सुख-समृद्धीमध्ये मानव आपली मन: शांती हरवून बसलेला आहे. जगामधील कितीही मौल्यवान व महागड्या भौतिक वस्तूंचा उपभोग घेऊ द्या.परंतु शांत झोप ,सुखी आणि समाधानी,निरोगी जीवन हेच खऱ्या अर्थाने आनंदी जीवनाचा मुलमंत्र आहे.असे प्रतिपादन लेखक व प्रेरणादायी वक्ते दत्तात्रय वारकड यांनी केले आहे.

अहिल्यानगर येथील जिल्हा कोषागार कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांना ''जीवनातील तान तणावापासून मुक्ती व आनंदी जीवन'' या विषयावर लेखक व प्रेरणादायी वक्ते दत्तात्रय वारकड यांनी व्याख्यान दिले. याप्रसंगी जिल्हा कोषागार कार्यालयाचे अप्पर कोषागार अधिकारी कुशाबा पिसे, रविंद्र काजळकर,संतोष ताठे, राजकुमार पुंड सहाय्यक कोषागार अधिकारी (नेवासा)व ओ.एस सुधीर देशपांडे आदींसह अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुढे बोलताना श्री वारकड म्हणाले,संत ज्ञानेश्वर माऊली,हिंदवी स्वराज्य चे संस्थापक छत्रपती श्री शिवाजी महाराज,महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले,लोकमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर या आदर्शवादी व्यक्तींच्या विचारांचा सांस्कृतिक वारसा जोपासावा व हीच आदर्शवादी शिकवण येणाऱ्या भावी पिढीला द्यावी. व त्यांचे विचार अंगी जोपासावेत.असे आवाहन दत्तात्रय वारकड यांनी उपस्थितांना केले.

जीवनात नकारात्मक विचारांना थारा न देता सकारात्मक, प्रभावी, बलाढ्य आणि बळकट स्वरूपाची विचारसरणी अंगीकारणे काळाची गरज आहे.सोशल मीडिया, मोबाईलचा अतिरिक्त वापर, व धावपळीचे जीवन याचा आपल्या दैनंदिन जीवनावर कळत नकळत विघातक स्वरूपाचा परिणाम होत असतो.अशा परिस्थितीत न डगमगता जीवनात येणाऱ्या आव्हानांना सडेतोड उत्तर देणे आवश्यक आहे.

''असे जगावे दुनियेमध्ये आव्हानांचे लावून अत्तर नजर रोखुनी नजरेमध्ये आयुष्याला द्यावे उत्तर''या कवी कुसुमाग्रज यांच्या प्रेरणादायी कवितेचा दाखला देत सर्व उपस्थितांचा उत्स्फूर्त प्रतिसाद वक्ते दत्तात्रय वारकड यांनी मिळवला. श्रोत्यांनी देखील प्रचंड टाळ्यांनी मनमुराद प्रतिसाद दिला व या प्रेरणादायी व्याख्यानाचा आनंद लुटला. आनंदी जीवन म्हणजे आयुष्याचा आनंदोत्सव होईल परंतु याकरिता आपण आपल्या जीवनामध्ये जर स्थैर्य हवे असेल तर धैर्य धरावेच लागेल. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सोनाली घनवट यांनी केले. तर मयूर सूर्यपुजारी यांनी आभार मानले.

## उन्हाळी शिबिर विद्यार्थ्यांसाठी खेळ, ज्ञान व मनोरंजनाची मेजवानी – जगदिश झालानी

### मेहेर इंग्लिश स्कूलमध्ये उन्हाळी शिबिराचे उद्घाटन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** उन्हाळ्याच्या सुट्टीत विद्यार्थ्यांना अभ्यासाव्यतिरिक्त मनोरंजन आणि खेळातून विद्यार्थ्यांच्या बौद्धिक,शारीरिक व मानसिक विकास व्हावा.यासाठी हस्तकला,चित्रकला,विविध खेळ,योगा, इको फ्रेंडली ज्वेलरी बनवणे, फॅशन शो,अबॅकस यांचे प्रशिक्षण देण्यात येते.विद्यार्थ्यांच्या कला गुणांचा विकसित होतो.मेहेर इंग्लिश स्कूलच्या माध्यमातून सर्वच मुलांना शिबिरात सहभागी होण्याची संधी दिली आहे.उन्हाळी शिबिर विद्यार्थ्यांसाठी खेळ, ज्ञान व मनोरंजनाची मेजवानीच आहे. शअसे प्रतिपादन मेहेर इंग्लिश स्कूलचे चेअरमन जगदिश झालानी यांनी केले आहे.

हिंदसेवा मंडळाच्या मेहेर इंग्लिश स्कूलमध्ये दिनांक २० एप्रिल ते २९ एप्रिल २०२६ या कालावधीत तीन वर्ष ते तेरा वर्षे वयोगटातील मुलांसाठी उन्हाळी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराचे उद्घाटन हिंद सेवा मंडळाचे कार्याध्यक्ष सुमतीलाल कोठारी यांच्या हस्ते फित कापून करण्यात आले.याप्रसंगी हिंदसेवा मंडळाचे कार्याध्यक्ष सुमतीलाल कोठारी,ज्येष्ठ मार्गदर्शक अजित



बोरा,सारडा महाविद्यालयाच्या जुनियर कॉलेजचे चेअरमन डॉ.पारस कोठारी, भाई सथ्था नाईट हायस्कूलचे चेअरमन प्रा.ज्योती कुलकर्णी, मेहेर इंग्लिश स्कूलचे चेअरमन जगदीश झालानी,विश्व मंगल आयुर्वेद चे संचालक डॉ.स्नेहलकुमार राहणे,प्राचार्य सुनील सुसरे,मेहेर इंग्लिश स्कूलच्या प्राचार्या प्रा.अनुरीता झगडे आदी उपस्थित होते.


सुमतीलाल कोठारी म्हणाले,मेहेर इंग्लिश स्कूलमध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विविध शैक्षणिक उपक्रम राबविले जातात.शाळेचे चेअरमन जगदीश झालानी व प्राचार्य अनुरीता झगडे यांच्या उत्कृष्ट नियोजनामुळे शाळेची प्रगती झपाट्याने होत आहे.नवीन वर्षात शाळेच्या नूतन इमारतीचे बांधकाम लवकरच सुरू होईल.असे त्यांनी यावेळी सांगितले.अजित बोरा यांनी उन्हाळी शिबिरासाठी आलेल्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा देऊन या शिबिरातून विद्यार्थ्यांनी कलागुण जोपासावेत असे सांगितले.

डॉ.पारस कोठारी म्हणाले, या शिबिरासाठी विद्यार्थ्यांकडून नाममात्र शुल्क आकारण्यात आले आहे. विद्यार्थ्यांनी सकस आहर घ्यावा.उन्हाळी शिबिर ही काळाची गरज आहे.अभ्यासात गुंतून न राहता हसत खेळत शिक्षण घ्यावे प्रा.ज्योती कुलकर्णी म्हणाले,मुलांनी फास्ट फूड,चायनीज, बर्गर, पिझ्झा,मॅगी या गोष्टींचे सेवन करू नये.तर मुलांनी पोळी भाजी,फळे यांचा आहार घ्यावा. उन्हाळी शिबिरामध्ये मनमुक्तपणे खेळण्याचा आनंद घ्यावा. डॉ.स्नेहलकुमार राहणे यांनी फिटनेस की पाठशाळा अंतर्गत विद्यार्थ्यांना आरोग्य विषयक मार्गदर्शन केले जाणार आहे.असे सांगितले. प्रास्तविकात प्रा.अनुरीता झगडे म्हणाले,उन्हाळी शिबिरातून विद्यार्थ्यांनी विविध खेळ आत्मसात करावे. नवनवीन तंत्रज्ञानाची माहिती घ्यावी तसेच आहाराविषयी डॉक्टरांचा सल्ला देण्यात येणार आहे.या शिबिरामध्ये रेन डान्स,अबॅकस, विविध खेळांमधून प्रशिक्षण विद्यार्थ्यांना दिले जाणार आहे. सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन देविका छजलानी यांनी केले.

**आकर्षण** हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी विराज मुद्रणालय, प्लॉट क्र. ९२,भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर – ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर– ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. *संपादक – विजय शामराव सांगळे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल : dainikaakarshan@gmail.com (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)
The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at Viraj Mudranalay, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). *Editor - Vijay Shamrao Sangale, Phone no. of main office - 7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com (*The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### रोमानिया येथे डॉ. बोरुडे यांच्या पुस्तकांचे प्रकाशन




अहिल्यानगर- पुढील आठवडयात रोमानिया येथे स्प्रिंग पोएट्री फेस्टिव्हल हा आंतरराष्ट्रीय कविता महोत्सव होत आहे . सदर महोत्सव कला आणि सांस्कृतिक अकादमी सलाज कंट्री , झलाऊ येथे दि . १८ ते २४ एप्रिल दरम्यान संपन्न होत आहे . यासाठी जगभरातील निवडक साहित्यिकांना आमंत्रित केले जाते. या महोत्सवात अहिल्यानगरचे सुपुत्र डॉ. संजय बोरुडे यांना विशेष आमंत्रित म्हणून पाचारण करण्यात आलेले आहे . डॉ. बोरुडे यांच्या जगभर गाजलेल्या या इंग्रजी कवितासंग्रहाचा हंगोरियन भाषेतील अनुवाद प्रकाशित होणार आहे. हा अनुवाद हंगेरी येथील ख्यातनाम कवयित्री मुरायनी झिटा यांनी केला असून रोमानियाच्या प्रसिद्ध एबीआर्ट कियाडो या प्रकाशन संस्थेने प्रसिद्ध केले आहे . तसेच डॉ. बोरुडे यांनी बुडापेस्टचे कवी सॅन्दोर हालमोसी यांच्या इंग्रजी पुस्तकाचा केलेला मराठी अनुवाद सिद्धतंत्रचे प्रकाशन होणार आहे. या महोत्सवात रोमानिया येथील वेगवेगळ्या शहरात साहित्यिकांच्या भेटी गाठी आणि चर्चासत्रे संपन्न होतील . दि .१९ ते २४ एप्रिल या दरम्यान आंतरराष्ट्रीय कविता महोत्सवाची वेगवेगळी सत्रे संपन्न होणार आहेत. डॉ. संजय बोरुडे यांनी मराठीतून शशिकांत हिंगोणेकर यांचा कश्मकश हा संग्रह हिंदीत; प्रशांत मोहंती यांच्या हिंदी कथांचा या नावाने इंग्रजीत अनुवाद; सॅन्दोर हालमोसी यांचा इंग्रजीतून मराठीत अभिसत्य नावाने तसेच त्यांच्या मराठी कवितांचे सादरीकरण होणार आहे . तसेच त्या कविता इंग्रजीतूनही कवयित्री रचना सादर करणार आहेत. रोमानिया येथे डॉ. बोरुडे यांच्या पुस्तकांचे प्रकाशन पुढील आठवडयात रोमानिया येथे स्प्रिंग पोएट्री फेस्टिव्हल हा आंतरराष्ट्रीय कविता महोत्सव होत आहे . सदर महोत्सव कला आणि सांस्कृतिक अकादमी सलाज कंट्री , झलाऊ येथे दि . १८ ते २४ एप्रिल दरम्यान संपन्न होत आहे . यासाठी जगभरातील निवडक साहित्यिकांना आमंत्रित केले जाते . या महोत्सवात अहिल्यानगरचे सुपुत्र डॉ. संजय बोरुडे यांना विशेष आमंत्रित म्हणून पाचारण करण्यात आलेले आहे . डॉ. बोरुडे यांच्या जगभर गाजलेल्या या इंग्रजी कवितासंग्रहाचा हंगोरियन भाषेतील अनुवाद प्रकाशित होणार आहे. हा अनुवाद हंगेरी येथील ख्यातनाम कवयित्री मुरायनी झिटा यांनी केला असून रोमानियाच्या प्रसिद्ध एबीआर्ट कियाडो या प्रकाशन संस्थेने प्रसिद्ध केले आहे . तसेच डॉ. बोरुडे यांनी बुडापेस्टचे कवी सॅन्दोर हालमोसी यांच्या इंग्रजी पुस्तकाचा केलेला मराठी अनुवाद सिद्धतंत्र चे प्रकाशन होणार आहे.

### २६ एप्रिल रोजी 'जनलोक एनजीआय क्रांती सत्याग्रह'

अहिल्यानगर- भारतीय समाजातील जातिव्यवस्थेचा अंत केवळ कायदे किंवा भाषणांद्वारे होणार नाही, तर मानवी मेंदूमधील 'नॉन-जेनेटिक इन्फॉर्मेशन' () बदलल्यानेच शक्य आहे, असा ठाम दावा करत पीपल्स हेल्पलाईनच्या वतीने दि. २६ एप्रिल रोजी अहिल्यानगर येथे 'जनलोक एनजीआय क्रांती सत्याग्रह' आयोजित करण्यात आला आहे. या माध्यमातून जात, अंधश्रद्धा व मतदास्य निर्मूलनासाठी राष्ट्रव्यापी वैचारिक उठाव उभारण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला आहे. या सत्याग्रहामागे ऐतिहासिक विचारांना विज्ञानाची जोड देणारा ठोस पाया असल्याचे स्पष्ट करण्यात आले. महात्मा ज्योतिराव फुले यांनी 'विद्येविना मती गेली' म्हणत अज्ञानाविरुद्ध लढा दिला. एनजीआय संकल्पना ही त्यांच्या सत्यशोधक विचारांची आधुनिक वैज्ञानिक आवृत्ती मानली जात आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जातीव्यवस्थेचा मानसिक पातळीवर अंत करण्याचा मार्ग दाखवला, तर महात्मा गांधी यांनी सत्याग्रहाद्वारे आत्मशक्ती जागवली. एनजीआय सत्याग्रह हा त्या आत्मजागृतीचा वैज्ञानिक विस्तार मानला जात आहे. पीपल्स हेल्पलाईनचे अध्यक्ष ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. कारभारी गवळी यांनी सांगितले की, १९५३ मध्ये जेम्स वॅटसन आणि फ्रान्सिस क्रिक यांनी डीएनएच्या रचनेचा शोध लावला. त्यानुसार कोणत्याही मानवात जात दर्शवणारे 'जीन्स' नसतात. त्यामुळे जात ही जैविक नसून मानसिक असून ती 'नॉन-जेनेटिक इन्फॉर्मेशन' स्वरूपात मेंदूत साठवली जाते.

## सनातन धर्मसभा गायत्री मंदिर अहिल्यानगरच्या वतीने प. पू. शंकराचार्य जयंती साजरी

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** सनातन धर्मसभा गायत्री मंदिर अहिल्यानगरच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही प. पू. शंकराचार्य जयंती निमित्ताने सामुदायिक(उपनयन) मुंजीचा कार्यक्रम आयोजित केला होता. प. पू. शंकराचार्य यांच्या प्रतिमेस खजिनदार उमेश नगरकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी मंत्री दिनकर देशमुख , उपाध्यक्ष डॉ.नंदकिशोर मुळे, वे.मू.पं.चकोर मुळे,वे.मू.उमेश वाळुंजकर,वे.मू. निलेश धर्माधिकारी, वे.मू.बंडोपंत धर्माधिकारी, अनंत देशपांडे , समीर उपाध्ये आदी मान्यवर उपस्थित होते. १२३८वी जयंती मोठ्या थाटामाटाने वैदिक पद्धती नुसार वेदमंत्रांचा जागर करुन साजरी करण्यात आली.

ह्या मंगलमय प्रसंगी सनातन धर्मसभेचे खजिनदार मा.ॲड.उमेशजी नगरकर ह्यांनी सनातन धर्मसभेची माहिती देताना सांगितलं की सदरहू संस्था गत १२० वर्षापासून धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करत आहे त्यामधे शंकराचार्य जयंती निमित्त सामुदायिक उपनयन मौंजीबंधन हे एक आहे. मुलांवर मौंजीचा संस्कार व्हावा त्यायोगे सक्षम नवीन पिढि तयार व्हावी हा शुद्ध हेतू मनी बाळगून सनातन धर्मसभा दरवर्षी हे धार्मिक आयोजन करत असते.

ह्या प्रसंगी शंकराचार्य प्रतिमा पूजन मंत्रजागर पठण करण्यात आले.सर्व संचालक मंडळांनी नूतन उपनीत बटूला शुभाशिर्वाद दिले तसेच उपनीत बटूच्या उज्वल भवितव्यासाठी शुभमंगल कामना शुभेच्छा दिल्या व ह्या सनातन धर्मसभेच्या कार्यक्रमास उपस्थित राहिल्याबद्दल सर्वांनी केलेल्या सहकार्याबद्दल कृतज्ञता आभार व्यक्त केले.भोजनप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## औसरकर मळा परिसरात 'आनंद चालीसा' पठणास उत्साहात प्रारंभ

### दर शनिवारी रात्री होणार आयोजन; श्रद्धाळूंना सहभागी होण्याचे आवाहन

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** सारसनगर परिसरातील औसरकर मळा येथे गुरु भक्तीची भावना वृद्धिंगत करण्यासाठी 'आनंद चालीसा' पठण या धार्मिक उपक्रमास उत्साहात प्रारंभ झाला आहे. प्रवर्तक गुरुदेव श्री कुंदनऋषि महाराज यांच्या प्रेरणेने प्रत्येक शनिवारी रात्री ९ वाजता हा उपक्रम नियमितपणे आयोजित करण्यात येणार आहे.

शनिवार (ता. १८) रोजी महासतीजी श्री ज्ञानप्रभाजी 'सरल' महाराज यांच्या सान्निध्यात ओम कॉलनी, नानाजी नगर, सारसनगर येथील श्री अमृतलाल चोरडिया यांच्या निवासस्थानी 'आनंद चालीसा' पठण भावपूर्ण वातावरणात पार पडले. याप्रसंगी सुनील गांधी, रितेश पारख, सुरेश मुनोत, हिरालाल गुंदेचा, दिपक कासवा, रोहित गांधी, पियुष भंडारी, नील गांधी, मोहित गांधी, सागर चोरडिया, आकाश चोरडिया, तुषार चोरडिया, दिपक गुगळे, प्रणय चोरडिया, प्रितेश लुंकड, अशोक छल्लाणी, कनकमल गांधी, किरण उकिर्डे, राजेंद्र नागपुरे आदी उपस्थित होते.

औसरकर मळा व परिसरात दर शनिवारी रात्री ९ ते ९.३० या वेळेत 'आनंद चालीसा' पठण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार असून, या उपक्रमात अधिकाधिक श्रद्धाळूंनी सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. कार्यक्रमास उपस्थित राहताना वेळेपूर्वी येऊन संपूर्ण पठणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले.

## विवाहितेच्या आत्महत्येप्रकरणी आरोपींची निर्दोष मुक्तता

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** मौजे चांदा, ता. नेवासा येथील श्रीधर खंडू दहातोंडे यांची मुलगी छकुली उर्फ वर्षा हिचा विवाह दिपक शंकर वाघ, रा. नवनागापूर, ता. नगर, जि. अहिल्यानगर यांच्याबरोबर ता. १५/०६/२०१९ रोजी झालेला होता. लग्नानंतर काही दिवस तिचे पती, सासू सासरे यांनी तिला चांगले वागविले. त्यानंतर मात्र तिला लग्नात सोने दिले नाही, वस्तू दिल्या नाहीत, तसेच कुट्टी मशिन घेण्यासाठी पैशाची मागणी करुन तिचा मानसिक, शारिरीक छळ केला, तिला त्रास दिला, त्या कारणावरुन तिने दि. ५/८/२०२० रोजी मौजे चांदा, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर येथील सारंगधर दहातोंडे यांचे विहीरीत उडी मारुन आत्महत्या केली. त्यावरुन दि. ७/८/२०२० रोजी पती दिपक शंकर वाघ, सासरे शंकर तबाजी वाघ व सासू नंदा शंकर वाघ यांच्याविरुद्ध सोनई पोलिस स्टेशन येथे गुन्हा भा.द.वि. कलम ३०४ (ब), ३०६, ४९८, ३२३, ५०४, ३४ अन्वये दाखल करण्यात आला. सदर गुन्ह्याचा तपास तत्कालीन पोलीस निरीक्षक श्री. थोरात यांनी करुन आरोपींविरुद्ध दोषारोपपत्र मा. न्यायालयात दाखल केले. सदर खटला जिल्हा न्यायाधिश - क्र. १, नेवासा यांचे कोर्टात चालला. सबळ पुराव्या अभावी मा. न्यायालयाने तिनही आरोपींची निर्दोष मुक्तता केली. खटल्यात आरोपींच्यावतीने ॲड. राजेंद्र शेलोत व ॲड. हर्षल राजेंद्र शेलोत यांनी काम पाहिले.

# आठवड शाळेत सातवीच्या विद्यार्थ्यांना निरोप देऊन नवागतांचे जल्लोषात स्वागत

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी




**अहिल्यानगर–** अहिल्यानगर तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आठवड येथे शाळेच्या प्रांगणात आज सातवीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभसोहळा, नावागतांचे स्वागत व गुणवंतांचा सन्मान हा कार्यक्रम अत्यंत उत्साही, भावनिक आणि प्रेरणादायी वातावरणात पार पडला. भावनांनी ओथंबलेल्या सोहळ्याच्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आठवड ग्रामपंचायत चे उपसरपंच मा. शंकर मोरे हे होते यावेळी विचार मंचावर प्रमुख अतिथी, पोलीस दलातील मा. शमुवेल सदानंद गायकवाड(पोलिस उपनिरीक्षक, वाहतूक शाखा अहिल्यानगर), प्रमुख वक्ते मा. अभिषेक अर्जुन घटमाळ(आदर्श शिक्षक नेवासा), सौ. सविताताई लगड (सरपंच आठवड), सुनील लगड सर, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नानासाहेब गाडे, माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष दिपक लगड, बी.एस. लगड, विठोबा लगड, शिवप्रसाद लगड, बाळासाहेब लगड, शाळेचे मुख्याध्यापक संदिप वाघमारे, गोरख वाबळे, अजय भद्रे, प्रमिला साठे, सारिका मोरे, वाटाडे मॅडम, सुनंदा मोरे, स्वाती मोरे, अलका मोरे, प्रवीण मोरे, सुनील चोभे, गणेश मोरे, जनसेवा संस्थेचे अध्यक्ष विनोद साळवे, सचिन लगड, कांबळे मेजर इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांचा परिचय शाळेतील शिक्षिका श्रीम. प्रमिला साठे मॅडम यांनी करुन दिला.

यावेळी इयत्ता पहिलीमध्ये नव्याने दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पाऊलांचे ठसे घेण्यात आले, त्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. इयत्ता सातवीच्या सर्व विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. सातवीच्या विद्यार्थ्यांनी ही शाळेतील वाचनालयाकरिता पुस्तके भेट म्हणून दिली. तसेच शाळेतील विद्यार्थ्यांनी निरोप समारंभाच्या वेळी विद्यार्थ्यांनी शिक्षकांविषयी आदर भाव व्यक्त करून आपल्या भावनांना वाट मोकळी केली. यावेळी प्रास्ताविकात संदीप वाघमारे म्हणाले की, आपली शाळा ही एक चांगली शाळा असून ग्रामस्थांचे शाळेला नेहमीच सहकार्य मिळत असते. कुंभार ज्याप्रमाणे मातीच्या गोळ्याला आकार देतो त्याचप्रमाणे शिक्षक देखील विद्यार्थी घडवण्याचे काम करतात. शिक्षक ज्यावेळी विद्यार्थ्यांना शिक्षा करतात, रागवतात हे विद्यार्थ्यांच्या भविष्याच्या दृष्टीने फायद्याचे असते. सातवीच्या विद्यार्थ्यांचा अध्ययन व अध्यापन करण्याचा दोन वर्षापासून माझ्याशी संपर्क आहे. निश्चितच हे विद्यार्थी यशाचे उंच शिखर गाठतील याचा मला आत्मविश्वास आहे

यांनी विद्यार्थ्यांना या शाळेतील संस्कार रुपी शिदोरी सोबत घेऊन जावी असे भावनिक आवाहन विद्यार्थ्यांना केले. आठवड सरपंच सौ. सविताताई लगड यांनी विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या. सुनील लगड यांनी शिक्षकांचे व विद्यार्थ्यांचे तोंड भरून कौतुक केले. विद्यार्थ्यांना जीवनामध्ये यशस्वी व्हायचे असेल तर विद्यार्थ्यांनी अभ्यास करावा. या शाळेतून जरी तुम्ही गेलात तरी शाळेविषयी गुरुजनांविषयी विद्यार्थ्यांनी नेहमी आदरभाव बाळगावा. शिक्षक गोरख वाबळे यांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान चिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा. गायकवाड साहेब यांनी आपल्या भाषणांमधून बोलताना विद्यार्थ्यांना वाहतूक सुरक्षेविषयी मार्गदर्शन केले. पालकांनीही आपल्या मुलांना १८वर्षे पूर्ण होईपर्यंत गाडी चालवण्यास देऊ नये असे निक्षून सांगितले. प्रमुख वक्ते अभिषेक घटमाळ यांनी बासरी वादनाने आपल्या व्याख्यानाची सुरुवात केली, त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श घेण्याचे आवाहन केले. पुढे ते म्हणाले की, इयत्ता सातवी हा प्राथमिक शिक्षणातील विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील केवळ एक वर्ग नाही, तर आयुष्याला कलाटणी देणारा निर्णायक क्षण आहे.

## अहिल्यानगरमध्ये समता परिषदेचे संस्थापक छगनराव भुजबळ यांचे स्वागत

### संघटित होणे हीच समाज प्रगतीची गुरुकिल्ली – छगन भुजबळ

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी




**अहिल्यानगर–** महाराष्ट्र राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री तसेच अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष छगन भुजबळ यांच्या अहिल्यानगर दौऱ्यावेळी अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद महानगरच्या वतीने स्वागत करण्यात आले.

यावेळी महानगर शहराध्यक्ष ब्रिजेश ताठे व कार्याध्यक्ष अभिषेक चिपाडे यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन भुजबळ यांचे स्वागत करण्यात आले. याप्रसंगी राज्य चिटणीस अंबादास गारुडकर, प्रथम महापौर भगवान फुलसौंदर, जिल्हा परिषद सदस्य अण्णासाहेब शेलार, कार्यकारिणी सदस्य कैलास फुलसौंदर, प्रकाश इवळे, राम व्यवहारे, प्रा. शिवाजी विधाते, देवेंद्र दुधाले, विश्वास शिंदे, शरद जाधव, अनुराग पडोळे, शुभम आव्हाड, निखिल ताठे, विशाल सुडके, स्वप्निल राऊत, अमृत क्षीरसागर, गणेश पडोळे यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.कार्याध्यक्ष अभिषेक चिपाडे यांनी महानगरच्या नव्या कार्यकारिणीची भुजबळ यांच्याशी ओळख करून दिली. शहरात संघटना अधिक बळकट करण्यासाठी सर्वांना सोबत घेऊन काम करण्याचा निर्धार व्यक्त करत महात्मा फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षानिमित्त विविध सामाजिक उपक्रम राबविण्याची माहिती दिली.

यावेळी भुजबळ यांनी सर्व कार्यकर्त्यांना शुभेच्छा देत समाजात जागृती निर्माण करणे व संघटित होणे अत्यंत आवश्यक असल्याचे सांगितले. "संघटित होण्याचे निश्चितच सकारात्मक परिणाम दिसतात. सर्वांना सोबत घेऊन प्रामाणिकपणे काम केल्यास समाज प्रगतीच्या दिशेने वाटचाल करेल," असा सल्ला त्यांनी दिला.

## आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे शुक्रवारी मोफत मूत्रविकार तपासणी शिबीर

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** जैन सोशल फेडरेशन संचालित आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे शुक्रवार दि.२४ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १० ते २ यावेळेत मूत्रविकार मोफत तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. पूर्ण वेळ मूत्र विकार तज्ज्ञ डॉ. अजित दरंदले, व्हिजिटिंग कन्सल्टंट युरोलॉजीस्ट डॉ. संकेत काळपांडे , युरोलॉजीस्ट डॉ. अमेय सांगळे, डॉ. स्वनित देशपांडे शिबिरात तपासणी व उपचार मार्गदर्शन करणार आहेत.

आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये मूत्र विकारावर अद्ययावत उपचार सुविधा उपलब्ध आहेत. शिबिरात प्रोस्टेट रोग व्यवस्थापन, युरेथ्रल स्ट्रीचर रोग व्यवस्थापन, पुरूष वंध्यत्व समुपदेशन, मूल्यमापन व व्यवस्थापन, महिलांचे मूत्र मार्गातील विकार, मूत्रमार्ग , मूत्राशय , प्रोस्टेट, जननेंद्रिय, अंडाशय कर्करोग व्यवस्थापन तपासणी व उपचार मार्गदर्शन केले जाईल.

हॉस्पिटलमध्ये हायटेक पॅथोलॉजी लॅब व ३५ अत्याधुनिक मशीनद्वारे डायलेसिस सुविधा उपलब्ध आहे. तसेच २४ तास आनंदऋषीजी ब्लड बँक सेवा उपलब्ध आहे. डिजिटील एक्स रे २५० रुपये, सोनोग्राफी कलर प्रिंट व रिपोर्टसह ८०० रुपये, सिटी स्कॅन १२५० रुपये, एम.आर. आय. २५०० रुपयांत उपलब्ध आहे. शिबिराचा जास्तीत जास्त रूग्णांनी लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

## नवदृष्टी मिळालेले मतदार बजावणार मतदानाचे हक्क

### फिनिक्स सोशल फाउंडेशनची मतदार जागृती; राहुरी पोटनिवडणुकीत १०० टक्के मतदान करणाऱ्या गावांना ५१ हजाराचे बक्षीस

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** फिनिक्स सोशल फाउंडेशनच्या वतीने मोफत नेत्र तपासणी शिबिर व मोतीबिंदू शस्त्रक्रियेच्या माध्यमातून नवदृष्टी मिळालेल्या ज्येष्ठ नागरिक व महिलांना मतदानाचे कर्तव्य बजावण्याचे आवाहन करण्यात आले. राहुरी पोटनिवडणुक आणि पुढील जिल्हा परिषद निवडणुकांमध्ये देखील मतदानाचा हक्क बजावून सक्षम उमेदवार निवडून देण्याचे स्पष्ट करण्यात आले. राहुरी पोटनिवडणुकीत ज्या गावात शंभर टक्के मतदान होईल त्या ग्रामपंचायतला संस्थेच्या वतीने ५१ हजार रुपयाचे बक्षीस देऊन सन्मान केला जाणार असल्याची माहिती फिनिक्सचे संस्थापक जालिंदर बोरुडे यांनी दिली.

फिनिक्स सोशल फाउंडेशनने मोफत नेत्र तपासणी शिबिराबरोबरच सामाजिक बांधिलकी जपत एक आगळा-वेगळा मतदार जागृतीचा उपक्रम हाती घेतला आहे. नागरदेवळे (ता. नगर) येथे नुकतेच आयोजित करण्यात आलेल्या या मोफत नेत्र तपासणी व शस्त्रक्रिया शिबिरास महिलांसह ज्येष्ठ नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या शिबिराच्या माध्यमातून मोतीबिंदू व काचबिंदूग्रस्त रुग्णांची तपासणी करून, त्यांची मोफत शस्त्रक्रिया पुणे येथील के. के. आय. बुधराणी रुग्णालयात यशस्वीरीत्या करण्यात आली. शस्त्रक्रियेनंतर दृष्टी परत मिळालेल्या रुग्णांचे शहरात आगमन होताच फिनिक्स सोशल फाउंडेशनच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले.

फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष जालिंदर बोरुडे यांनी नवदृष्टी मिळालेल्या ज्येष्ठ नागरिकांशी संवाद साधत, या नव्या दृष्टीचा उपयोग केवळ स्वतःच्या जीवनातच नव्हे, तर लोकशाही बळकट करण्यासाठी मतदानाचा हक्क बजावण्यासाठीही करावा, असे आवाहन केले. "मतदान हा प्रत्येक नागरिकाचा अधिकार आणि राष्ट्रीय कर्तव्य आहे. नवदृष्टीतून चांगला, प्रामाणिक आणि विकासाभिमुख उमेदवार निवडण्यासाठी सर्वांनी मतदान करावे," असे त्यांनी यावेळी सांगितले.

यावेळी उपस्थित ज्येष्ठ नागरिक व महिलांनीही मिळालेल्या नवदृष्टीतून योग्य उमेदवाराची निवड करून मतदानाचा हक्क बजावण्याचा निर्धार व्यक्त केला. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील दृष्टीहीन व अल्पदृष्टीग्रस्त रुग्णांना दृष्टी मिळावी, यासाठी फिनिक्स सोशल फाउंडेशनने जिल्हाभरात एक व्यापक सामाजिक चळवळ उभी केली आहे.

## फ्रेंड्स कॉर्पोरेट लीगमध्ये रंगले थरारक सामने; शिवराज ॲडव्होकेट आणि नगर चॅम्पियनचा विजय

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी




**अहिल्यानगर–** रविवार, दि. १९ एप्रिल रोजी पार पडलेल्या फ्रेंड्स कॉर्पोरेट लीग स्पर्धेत दोन अत्यंत रंगतदार सामने पाहायला मिळाले. दोन्ही सामन्यांत खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत प्रेक्षकांना क्रिकेटचा भरपूर आनंद दिला.

पहिल्या सामन्यात शिवराज ॲडव्होकेट संघाने प्रथम फलंदाजी करताना ५ गड्यांच्या मोबदल्यात १५२ धावांचा भक्कम डाव उभारला. संघाच्या फलंदाजांनी संयम आणि आक्रमकता यांचा उत्तम समन्वय साधत प्रतिस्पर्ध्यांसमोर आव्हानात्मक लक्ष्य ठेवले. प्रत्युत्तरात ए बी ॲक्ट अहिल्यानगर संघाला अपेक्षित कामगिरी करता आली नाही. त्यांचा डाव ७ गड्यांच्या मोबदल्यात १०० धावांवरच थांबला. या सामन्यात उत्कृष्ट खेळी करणाऱ्या भारत रासकर यांना सामनावीर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

दुसरा सामना अधिकच चुरशीचा ठरला. नगर चॅम्पियन संघाने प्रथम फलंदाजी करताना ८ गड्यांच्या मोबदल्यात १६२ धावा करत मजबूत स्कोअर उभारला. लक्ष्याचा पाठलाग करताना नगर सुपर किंग संघाने शेवटपर्यंत जोरदार लढत दिली. मात्र त्यांना ६ गड्यांच्या मोबदल्यात १५७ धावांपर्यंतच मजल मारता आली आणि अवघ्या ५ धावांनी पराभव स्वीकारावा लागला. या रोमांचक सामन्यात कर्नल अंकुर बशोत्रा यांनी उत्कृष्ट सर्वांगीण कामगिरी करत सामनावीर पुरस्कार पटकावला.

# नगरी पोलीस अधिकाऱ्याने गाजवली दिल्लीतील ‘सीआरपीएफ’ ची परेड

## महेश जंजिरे यांनी दिल्लीच्या गुरुग्राममध्ये केंद्रीय गृहराज्यमंत्र्यांसमोर केले शानदार संचलन

**नवीदिल्ली । वृत्तसंस्था–** येथील गुरुग्राम मधील केंद्रीय राखीव पोलीस दल अकादमीत ‘सीआरपीएफ’ मधील असिस्टंट कमांडंट या पदाचे एक वर्षाचे अत्यंत खडतर असे प्रशिक्षण पूर्ण केलेल्या ४६ अधिका–यांना आज ( ता. २२) रोजी दीक्षांत समारंभात देशसेवेची शपथ देण्यात आली. यावेळी झालेल्या पासिंग आऊट परेडमध्ये श्रीगोंदा येथील महेश जंजिरे यांनी शानदार संचालन करीत सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

या परेडसाठी प्रमुख पाहुणे म्हणून केंद्रीय गृहराज्यमंत्री बंडी संजय कुमार यांच्यासह ‘सीआरपीएफ’ चे विशेष महानिरीक्षक जकी अहमद, अकादमीचे संचालक अमित कुमार यांच्यासह ‘सीआरपीएफ’ चे अधिकारी, महेश शिंदे यांच्यासह प्रशिक्षण पूर्ण केलेल्या ४६ असिस्टंट कमांडंट अधिकाऱ्यांचे कुटुंबीय व नातेवाईक उपस्थित होते.

अहिल्यानगर येथील महेश जंजिरे यांनी एक वर्षाच्या कठोर आणि शिस्तबद्ध प्रशिक्षणानंतर असिस्टंट कमांडंट म्हणून उत्तीर्ण होत उल्लेखनीय यश संपादन केले त्यांचे उपस्थितांनी विशेष कौतुक केले.

महेश जंजिरे यांच्या या यशामुळे अहिल्यानगरसह संपूर्ण महाराष्ट्रातून त्यांच्यावर अभिनंदनाचा




वर्षाव होत असून, त्यांच्या या यशाने यूपीएससी परीक्षांची तयारी करणा–या तरुणांना प्रेरणा मिळत आहे.

या दीक्षांत समारंभासाठी महेश जंजिरे यांचे वडील ईश्वर जंजिरे, आई सुनीता जंजिरे, पत्नी वास्तुविशारद काजल दरेकर, सामाजिक कार्यकर्ते सुनील दरेकर, अश्विनी दरेकर, ॲड. सविता बोठेपाटील यांच्यासह अहिल्यानगर व श्रीगोंदा येथील विविध क्षेत्रातील मंडळी उपस्थित होती.

युपीएससी परीक्षेत मराठी तरुणांचा टक्का वाढण्यासाठी मदतीची तयारी : महेश जंजिरे

महेश जंजिरे यांनी यावेळी सांगितले की, युपीएससीमध्ये मराठी टक्का वाढायला हवा. मराठी मुलांमध्ये युपीएससी परीक्षेबाबतची विनाकारण असलेली भीती व न्यूनगंड दूर करुन त्यांच्यात अभ्यासाची जिद्द व प्रशासनात अधिकारी होण्याची उर्मी निर्माण करण्याची गरज आहे. त्यासाठी तसेच शिस्तबद्ध अभ्यासासाठी महाराष्ट्रातील इच्छुक तरुणांना मदत करण्याची आपली तयारी आहे, असे महेश जंजिरे यांनी सांगितले. त्यांच्या या भूमिकेचे दीक्षांत समारंभाला उपस्थित मराठी मंडळींनी जोरदार स्वागत करुन त्यांचे अभिनंदन केले.

# डॉ. अग्रवाल्स आय हॉस्पिटलने अहिल्यानगर येथे अत्याधुनिक नेत्रसेवा केंद्राचे उद्‌घाटन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** महाराष्ट्रातील वाढत्या उपस्थितीला अधिक बळकटी देत, डॉ. अग्रवाल्स आय हॉस्पिटलने आज अहिल्यानगर येथे अत्याधुनिक नेत्रसेवा केंद्राचे उद्घाटन माननीय श्री. संग्राम जगताप (महाराष्ट्र विधानसभेचे आमदार) यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डॉ. अग्रवाल्स आय हॉस्पिटलच्या वरिष्ठ नेतृत्वातील डॉ. वंदना जैन (चीफ स्ट्रॅटेजी ऑफिसर) आणि श्री. राहुल अग्रवाल (चीफ ऑपरेटिंग ऑफिसर) तसेच वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. अहिल्यानगर परिसरातील वेगाने विकसित होत असलेल्या भागातील नागरिकांना प्रगत आणि सर्वसमावेशक नेत्रसेवा उपलब्ध करून देणे हा या केंद्राचा उद्देश आहे.

उद्घाटनाच्या निमित्ताने, ३१ मे २०२६ पर्यंत सर्व रुग्णांसाठी मोफत सर्वसमावेशक नेत्र तपासणीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे, ज्यामुळे लवकर निदान आणि प्रतिबंधात्मक काळजीला प्रोत्साहन मिळेल. अपॉइंटमेंट साठी कृपया ८९२५५ १०८०७ या मोबाईल क्रमांकावर सम्पर्क संपर्क असे आवाहन संस्थेतर्फे करण्यात आले आहे

६,७३५ चौरस फूट क्षेत्रफळावर पसरलेले हे केंद्र आधुनिक पायाभूत



सुविधा आणि प्रगत तंत्रज्ञानाच्या साहाय्याने रुग्णकेंद्रित सेवा देण्यासाठी विशेषतः डिझाइन करण्यात आले आहे. या रुग्णालयात मोतीबिंदू, रिफ्रॅक्टिव्ह (लेसिक), कॉर्निया, काचबिंदू, रेटिना आणि बाल नेत्रचिकित्सा यांसारख्या सर्व सेवा उपलब्ध आहेत. तसेच एकाच छताखाली फार्मसी आणि ऑप्टिकल सेवा उपलब्ध करून देत संपूर्ण नेत्रसेवा प्रदान केली जाते. अनुभवी नेत्रतज्ज्ञ आणि प्रशिक्षित वैद्यकीय कर्मचाऱ्यांच्या टीमद्वारे उच्च दर्जाची सेवा आणि उत्तम उपचार, परिणाम सुनिश्चित केले जातील.

या प्रसंगी बोलताना आमदार श्री. संग्राम जगताप म्हणाले, ‘‘अहिल्यानगर सारख्या वेगाने विकसित होणाऱ्या भागांमध्ये सुलभ आणि विशेषीकृत आरोग्यसेवेची गरज वाढत आहे. डॉ. अग्रवाल्स आय हॉस्पिटलने प्रगत नेत्रसेवा लोकांपर्यंत पोहोचवण्याचे कार्य केल्याबद्दल मी त्यांचे कौतुक करतो. यामुळे दृष्टीसंबंधित समस्यांचे लवकर निदान, प्रतिबंध आणि उपचार करण्यात महत्त्वाची भूमिका निभावली जाईल.’’

डॉ. वंदना जैन (चीफ स्ट्रॅटेजी ऑफिसर) यांनी सांगितले, ‘‘डॉ. अग्रवाल्स आय हॉस्पिटलमध्ये आमचा मुख्य भर प्रगत नेत्रसेवा अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवण्यावर आणि उच्च दर्जाची वैद्यकीय गुणवत्ता राखण्यावर आहे. अहिल्यानगर केंद्र हे या वेगाने विकसित होणाऱ्या भागातील रुग्णांपर्यंत विशेष सेवा पोहोचवण्याच्या दृष्टीने एक महत्त्वाचे पाऊल आहे.’’

श्री. राहुल अग्रवाल (चीफ ऑपरेटिंग ऑफिसर) म्हणाले,‘‘आम्ही रुग्णकेंद्रित सुविधा उभारण्यावर लक्ष केंद्रित करत आहोत, ज्या मजबूत क्लिनिकल प्रणाली आणि उत्कृष्ट व्यवस्थापनावर आधारित आहेत. हे केंद्र उच्च दर्जाचे उपचार, परिणाम आणि उत्कृष्ट रुग्ण अनुभव देण्यासाठी डिझाइन केले आहे.’’

# भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने आयोजित ‘युवाशक्ती जागर मोर्चा’या राज्यव्यापी दौऱ्याचा शुभारंभ



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** राज्यातील युवकांना राष्ट्रनिर्मितीच्या ध्येयाशी जोडण्याची आणि त्यांच्या उर्जेला सकारात्मक दिशा देण्याची व्यापक मोहीम सुरू – रविंद्र चव्हाण, भाजपा प्रदेशाध्यक्ष भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने आयोजित ‘युवाशक्ती जागर मोर्चा’या राज्यव्यापी दौऱ्याचा मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत मुंबईतून दणक्यात शुभारंभ झाला. यामुळे राज्यातील युवकांना राष्ट्रनिर्मितीच्या ध्येयाशी जोडण्याची आणि त्यांच्या उर्जेला सकारात्मक दिशा देण्याची व्यापक मोहीम सुरू झाल्याचे उद्गार भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी काढले.

या प्रसंगी भाजपा युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक यांनी, भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण हे व्यासपीठावरील सर्वात युवा मनाचे आणि ऊर्जावान नेतृत्व असल्याचे नमूद केले.

आपल्या मनोगतात प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी यात्रेचा उद्देश स्पष्ट करताना सांगितले की, ‘‘भाजप युवा मोर्चा महाराष्ट्र प्रदेशच्या वतीने राबवण्यात येणारा हा अशा प्रकारचा पहिलाच उपक्रम आहे. केंद्र व राज्य सरकारने तरुणाईसाठी घेतलेले लोककल्याणकारी निर्णय या यात्रेच्या माध्यमातून राज्याच्या कानाकोपऱ्यातील युवकांपर्यंत पोहोचवले जातील. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांना अपेक्षित असलेले सक्षम आणि प्रभावी युवाशक्तीचे संघटन उभारणे, हेच या यात्रेचे मुख्य ध्येय आहे.’’ ‘जागर युवाशक्तीचा, सशक्त राष्ट्रनिर्मितीचा’हा संदेश देणारी ही यात्रा राज्यातील युवकांना एकत्र आणत त्यांना विकास, नवकल्पना आणि राष्ट्रहिताच्या विचारांशी जोडण्याचे कार्य करणार आहे. भाजपा युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक यांच्या नेतृत्वात ही यात्रा महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचणार असून, युवकांमध्ये जागर निर्माण करून त्यांना सामाजिक आणि राष्ट्रीय बांधिलकीची जाणीव करून देईल, असा विश्वास प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी व्यक्त केला.

या कार्यक्रमास मंत्री जयकुमार गोरे, मंत्री अतुल सावे, मंत्री नितेश राणे, राज्यसभा खासदार धनंजय महाडिक, राज्यसभा खासदार अशोक चव्हाण, भाजपा प्रदेश सरचिटणीस व भाजयुमो प्रदेश प्रभारी सुनील राणे, मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांच्यासह इतर मान्यवर, भाजयुमोचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने युवक उपस्थित होते.

# मनोहर उर्फ बाबाशेठ अडसुळ यांची व्हाईस चेअरमनपदी बिनविरोध निवड

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** भनगडेवाडी विविध कार्यकारी सेवा सोसायटीच्या व्हाईस चेअरमनपदी मनोहर उर्फ बाबाशेठ अडसुळ यांची बिनविरोध निवड करण्यात आली. या निवडीमुळे गावात आनंदाचे व समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून सर्व स्तरातून त्यांचे स्वागत होत आहे. या निवडीमागे गावातील एकजूट, परस्पर विश्वास आणि दिलेला शब्द पाळण्याची परंपरा अधोरेखित झाली आहे. विशेष म्हणजे, डॉ. राजेश भनगडे यांनी दिलेला शब्द पूर्ण करत या निवड प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावली.



यावेळी श्री. संतोष चौधरी, श्री. देविदास फलके, श्री. बाळासाहेब भनगडे, श्री. भाऊशेठ ठोकळ, श्री. अशोक फलके, श्री. छबुराव चौधरी सर, श्री. गणेश दरेकर, श्री. रंगनाथ भोंडवे, श्री. अण्णासाहेब वाघ, श्री. संदीप वाघ, श्री. भास्कर गावडे, श्री. बाजीराव ठोकळ आदी मान्यवर उपस्थित होते.

सोसायटीचे चेअरमन श्री. संतोष चौगुले यांच्या नेतृत्वाखाली तसेच मा. अमोल ठाणगे सर, श्री. मोहन भनगडे आणि सर्व संचालकांच्या सहकार्याने सोसायटीची वाटचाल प्रगतीपथावर सुरू आहे. शेतकरी व सभासदांच्या हिताचे निर्णय घेऊन संस्थेचा सर्वांगीण विकास साधण्यावर भर दिला जात आहे.

नवीन व्हाईस चेअरमन मनोहर उर्फ बाबाशेठ अडसुळ यांनी सर्वांचे आभार मानत, ‘‘सोसायटीच्या प्रगतीसाठी आणि शेतकरी सभासदांच्या हितासाठी प्रामाणिकपणे काम करणार,’’ असा विश्वास व्यक्त केला.

(पान १ वरून)

## कत्तलीसाठी चालविलेल्या ६२ गोवंशीय जनावरांची सुटका

अन्वर मजीद कुरेशी (रा. कुरेसी गल्ली, राशीन ता. कर्जत), साहिल गफार कुरेशी (रा. कुरेशी गल्ली, राशीन ता. कर्जत) व इरफान उर्फ बबलु माजिद कुरेशी (रा. कुरेशी गल्ली राशीन ता. कर्जत) यांची असून ही जनावरे येडशी (जि. धाराशिव) येथे कत्तल करण्यासाठी चालविली असल्याची माहिती दिली. या कारवाईत पथकाने १८ लाख ३५ हजार रुपये किमतीची ६२ लहान–मोठी गोवंशीय जनावरे व ४७ लाख रुपये किमतीची तीन चारचाकी वाहने असा एकूण ६५ लाख ३५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. आरोपींविरुध्द कर्जत पोलीस ठाण्यात महाराष्ट्र पशुसंरक्षण अधिनियम सन १९९५ चे सुधारीत २०१५ चे कलम ५, (अ),५(ब), ९ सह प्राण्यांना निर्दयतेने वागविणेचे कलम ३, ११ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## कायनेटिक चौकातील धोकादायक वाहतुकीवर उपाययोजना राबवाव्यात

नाराजी निर्माण झाली आहे. सदर परिस्थितीकडे वारंवार दुर्लक्ष होत असल्याचे स्पष्टपणे जाणवत आहे. उद्या पुन्हा एखादी दुर्दैवी घटना घडल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित प्रशासनावर राहील, याची नोंद घ्यावी. या अत्यंत गंभीर विषयाची तात्काळ दखल घेऊन पुढील उपाययोजना त्वरित राबविण्यात याव्यात:अन्यथा, स्थानिक नागरिकांना पुढील काळात आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल, असा इशाराही बांगरे यांनी दिला आहे.

**जीव धोक्यात घालून करावा लागतोय प्रवास**

या चौकात यापूर्वी अनेक गंभीर व जीवघेणे अपघात घडलेले असून, निष्पाप नागरिकांना आपला जीव गमवावा लागला आहे. पुण्याकडून येणारी वेगवान वाहने तसेच दौंड रोडकडून येणारे जड व्यावसायिक ट्रक यामुळे या परिसरातील वाहतूक अत्यंत धोकादायक बनली आहे. परिणामी, ये–जा करणारे नागरिक, विशेषतः ज्येष्ठ नागरिक, महिला व लहान मुले यांना दररोज जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत आहे.

## भरदिवसा शेतात सासू–सुनेवर हल्ला

ताराबाई यांच्या कानांना तसेच डाव्या पायाला गंभीर दुखापत झाली. हल्ल्यानंतर आरोपींनी सासूच्या कानातील सोन्याची कर्णफुले, गळ्यातील पोत तसेच सुनेच्या गळ्यातील मंगळसूत्र असा एकूण सुमारे ७८ हजार रुपयांचा ऐवज जबरदस्तीने हिसकावून घेतला आणि दुचाकीवरून पिंपळा गावाच्या दिशेने पसार झाले. जखमींवर खासगी रुग्णालयात उपचार करण्यात आले असून प्रकृतीत सुधारणा झाल्यानंतर त्यांनी पोलिसांत धाव घेतली. घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक किरणकुमार कबाडी तसेच नगर तालुका पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक गणेश वारुळे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०९ (६) अन्वये दोन अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक उमेश पतंगे करत आहेत. दरम्यान, भरदिवसा घडलेल्या या धाडसी प्रकारामुळे परिसरातील शेतकरी वर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून पोलिसांनी गस्त वाढवावी, अशी मागणी स्थानिकांकडून केली जात आहे.

## एआयसारख्या मायावी धोक्याशी लढण्याची ताकद रामचरित मानस देईल – डॉ. कुमार विश्वास

सीतेचे अपहरण केले. हे त्या काळचे मायावी एआय तंत्रज्ञानच होते. त्यानंतर खर व दूषण या राक्षसांनी मायाजाल पसरवताना युद्धात रामाला संभ्रम येईल अशी माया केली. तेही त्या काळातील एआयचाच प्रकार होता. मात्र, प्रभू रामाने अमोघ बाणाच्या साह्याने हे मायाजाल नष्ट करत त्यांचे कोडींग तोडून माया नष्ट केली, त्यामुळे या मागचे तंत्रज्ञान संशोधनाच्या माध्यमातून स्पष्ट केले तर आपण पण एआय सारख्या मायावी धोक्याचा सामना करू शकतो, असा दावा विश्वास यांनी केला.

डॉ.कुमार विश्वास पुढे म्हणाले, रामाने कोणतेही देवत्व न दाखवता फक्त मानवी जीवनातील समस्या मिटवण्यासाठी कसा संघर्ष आवश्यक आहे हे आपल्या आदर्श जीवनातून दाखवून दिले. त्याने वनवास स्वीकारला, काट्याकुट्यातून रस्ता काढला, पत्नीचे अपहरण झाले, बलाढ्य शत्रूशी लढताना वनवासी लोकांचे सहाय्य घेतले, शत्रूचा शरण आलेला भाऊ बिभीषणला लंकाधिश करण्याचे वचन दिले, शत्रूशी लढताना भावाचे व मित्रांचे सहाय्य घेतले आणि सर्वात महत्त्वाचे स्वतःच्या क्षमतेवर व शौर्यावर विश्वास ठेवला. मानवी जीवनातही अशा अनेक समस्या प्रत्येकाला येतात पण त्यामुळे हतबल न होता समर्थपणे त्यांचा सामना करण्याचा संदेश रामायणातून दिला गेला आहे, असे डॉ. विश्वास यांनी नमूद केले. सध्याच्या काळात प्रत्येकाची उपयोगिता पाहिली जाते व त्यामुळेच वृद्धाश्रम वाढत असल्याचे दुर्दैव आहे. परंतु माता–पिता व साधुसंतांची उपयोगिता पाहू नये. त्यांचे अस्तित्वच नवा आत्मविश्वास देते. तुम्ही आई–वडिलांसोबत राहिले नाही तर तुमची मुलेही तुमच्या समवेत राहणार नाहीत. हितसंबंध व सत्य स्वीकारण्याची वेळ आली तर सत्य स्वीकारा. स्वतः रामाने त्याच्या जीवनातून हे दाखवून दिले आहे, असे स्पष्ट करताना डॉ. विश्वास म्हणाले, घरातील मोठा भाऊ पित्यासमान व मोठी वहिनी मातेसमान असते तर धाकट्या भावाने प्रभू रामाची सावली असलेल्या लक्ष्मणासारखे असले पाहिजे. घरात देवाचे मंदिर हवे, दारूचा बार असणे हे पतन होण्याचे लक्षण आहे. दान देताना नावाचे प्राबल्य नको, असे आवाहनही त्यांनी केले.

## परशुरामाची परशु दाखवण्याकरीता नसून अन्यायाच्या विरोधामध्ये चालवण्यासाठीच – आमदार गोपीचंद पडळकर

वेगवेगळया जाती वेगवेगळया फुलासारखी आहेत ब्राम्हणाकडून मोठे काम करणे अपेक्षित आहे ते म्हणजे हिंदू वेगवेगळया जातीमध्ये विखुरला आहे त्या समाजाला एकत्रित गुंफण्याचे काम आहे भगवान परशुराम हे भगवद अवतार होते या अवताराची आराधना टिकवणे महत्वाचे आहे भगवान परशुराम चरीत्रात मातृपितृ भक्ती शिकायला मिळते.

ह.भ.प. रेणुकाताई निसळ म्हणाली हिंदू समाजाचे विचार कसे आम्ही दोन आणि आमचे दोन आम्ही दोन आणि आमचे दोन आमचाच होता चौकोन चौकोनातून जातात दोन आणि उरलेल्यांना आधार कोण अशी परिस्थिती आपल्या धर्माची आज भोजनाला साठ, भजनाला आठ आणि धर्मकार्यासाठी आले तर आले नाहीतर चल हट घरातील मुलीला जवळ बसवून दोन गोष्टी सांगा बाई तू मोठी होऊन डॉक्टर , इंजिनियर ,वकील झाली नाही तरी चालेल पण बाई तुला मोठं होऊन चारित्र संपन्न व्हायचं म्हणजे व्हायचं ही पहिली गोष्ट मुलीला सांगा आणि दुसरी गोष्ट मुलीला सांगा की बाई तू तुझ्या मनाला इतकं कठोर बनव की सुंदरातला सुंदर , कर्तृत्व संपन्न , रूपसंपन्न मुलगा तुझ्यासमोर येऊ दे पण तुझा तुझा ब्रह्मचर्य मोडणार नाही दोन गोष्टी जर आपल्या घरातील मुलीला सांगितले ना तरच पुढे जाऊन परशुराम भगवंतासारखे वीर पुरुष आपल्या घरी जन्म घेऊ शकतील बालकांना आपल्या शक्तीने आपल्या तेजाने संपूर्ण पृथ्वीतलावर धर्माची स्थापना करतील फक्त भगवंताचं नाव जय परशुराम म्हणून चालणार नाहीये आज फक्त परशुराम भगवंत हे ब्राह्मण दैवत नाहीये तर संपूर्ण हिंदू समाजाचा दैवत आहे प्रत्येकानं परशुराम भगवंतांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवत प्रत्येकानं आपल्या जातीपातीला सोडून फक्त एकच धर्म हिंदू धर्मासाठी जगण्याची गरज आहे.

मान्यवरांच्या हस्ते श्री भगवान परशुरामाची महाआरती करून सांगता झाली.

आमदार गोपीचंद पडळकर यांना भगवान परशुरामाची परशु तसेच समर्थ भक्त मंदारबुवा रामदासी श्री समर्थ रामदास स्वामी फोटो भेट देण्यात आला. कार्यक्रम यशस्वितेसाठी प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजय देशपांडे, श्रीया देशमुख, अनंत कुलकर्णी, अतूल शुक्ल अनिरुद्ध भहूरकर ,अरुण आवटी, सार्थक भोंग,देवांग कुलकर्णी,ऋतु वैद्य, संकल्प उदास,सायली कुलकर्णी, स्वाती गटणे , कृतार्थ भोंग, अथर्व कुकडे, अथर्व देशपांडे, अबोली कुलकर्णी, दिपाली टाकळकर,उदय जोशी आदीनी परीश्रम घेतले. त्याचप्रमाणे मोठ्या संख्येने महिला व ज्ञाती बांधव सामील झाले होते.


# पाहिजेत

**नाशिक डायोसेशन कौंसील, पी.टी.आर.डी. – २ नाशिक ही संस्था अल्पसंख्यांक संस्था असून संस्था संचालित सेंट सेव्हीअर्स हायस्कुल व जुनिअर कॉलेज, तारकपूर अहिल्यानगर. या शाळेत शिक्षक रिक्त व अत्यावश्यक पदासाठी खालील शैक्षणिक पात्रता धारक उमेदवारांकडून अर्ज मागवण्यात येत आहे.**

| अ. क्र. | पदाचे नाव | शैक्षणिक अहर्ता | पदाची संस्था |
|---|---|---|---|
| १. | शिक्षण सेवक | B.A/M.A.B.Ed Marathi and Hindi | ०२ |
| २. | शिक्षण सेवक | B.Sc/M.Sc.B.Ed Science and Maths | ०२ |
| ३. | क्रीडा शिक्षक | B.A./B.Sc/B.PEd/ M.PEd | ०१ |
| ४. | कनिष्ठ लिपिक | Graduate, English and Marathi Typing (MSCIT) | ०१ |

१) सदर संस्था ही अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त संस्था असून संस्थेस आरक्षण धोरण लागू होत नाही. २) भारतीय घटनेच्या कलम ३० (१) नुसार प्राप्त असलेले अधिकार व मा. सर्वोच्च न्यायालय आणि मा. उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार निर्णय क्र. एसएसएन २०१५/ प्र. क्र. २०/१५/ टीएनटी–२ दि. १३ जुलै २०१६ आणि क्रमांक – संकीर्ण २०२२ / प्र. क्र. १४/ टिएनटी–१ दि. ११ डिसेंबर २०२४, तसेच मा. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य अल्पसंस्थांक आयोग, मुंबई यांचे दि. २२/०८/२०२४ रोजीचे आदेशान्वये जाहिरात प्रसिद्ध करण्यात येत आहे. ३) वरील पदासाठी महाराष्ट्र खाजगी शाळातील सेवक (सेवा शर्ती ) अधिनियम १९७७ व नियमावली १९८१ मधील तरतुदी लागू राहतील. ४) महाराष्ट्र शासन सामान्य विभाग शासन निर्णय क्रमांक २०००/ प्र. क्र. ५/ २००१ /३९ दि. २० जुलै २०१९ नुसार शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची संगणक हाताळणी प्रमाणपत्र मिळणे बंधनकारक राहील. ५) महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसार शिक्षक पदासाठी शिक्षक पात्रता परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. ६) अर्जासोबत शैक्षणिक अर्हतेबाबतची गुणपत्रके व प्रमाणपत्र आणि कागदपत्राच्या साक्षांकित केलेल्या छायांकित प्रती जोडाव्यात. ७) उमेदवारांची लेखी परीक्षा घेऊन मुलाखतीसाठी पात्र उमेदवार निवडण्यात येतील. ८) शासनाचे नियमाप्रमाणे वेतन व भत्ते मिळतील तसेच शासनाचे वेळोवेळी येणारे आदेश बंधनकारक राहतील. ९) शासनाने वेळोवेळी शासन निर्णयाद्वारे विहीत केली जाणारी वयोमर्यादा उमेदवारांना लागू राहील. १०) पात्र उमेदवारांनी दि. ५/५/२०२६ रोजी लेखी परीक्षा व मुलाखतीकरिता सकाळी १०.०० वाजता आपल्या आवश्यक मुळ कागदपत्र व प्रमाणपत्रासह स्वखर्चाने खालील पत्त्यावर उपस्थित रहावे.

**पत्ता – मुख्याध्यापक, सेंट सेव्हिअर्स हायस्कुल, जुनिअर कॉलेज, तारकपूर, अहिल्यानगर.**

**मुख्याध्यापक /सचिव**
**सेंट सेव्हिअर्स हायस्कुल व जुनिअर कॉलेज,**
**अहिल्यानगर**